## प्रकरण तिसरे

# 'लोकसखा ज्ञानेश्वर' : आशयसूत्र

प्रकरण तिसरे

# 'लोकसखा ज्ञानेश्वर' : आशयसूत्र


३.१ प्रस्तावना

३.२ 'लोकसखा ज्ञानेश्वर' मधील आशयसूत्र

३.३ समारोप

संदर्भ

प्रकरण तिसरे

# 'लोकसखा ज्ञानेश्वर' : आशयसूत्र

## ३.१ प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीतील आशयसूत्रांचा विचार करावयाचा आहे. कादंबरी हा वाङ्मयप्रकार जीवन प्रवाहाबरोबर वाढत, बदलत जाणारा असा साहित्यप्रकार आहे. कादंबरीची संरचना ही घटना, कथानक, वातावरण, पात्रे, भाषा, निवेदक इत्यादी घटकांवर अवलंबून असते.

आशयसूत्र हा कादंबरीचा अविभाज्य घटक असल्याने आशयसूत्राशिवाय कादंबरीची, रचना होऊ शकत नाही. आशयसूत्राच्या पायावरच कादंबरीकार कादंबरीचे कथानक रचित असतो. लेखक कथानकातून आणि व्यक्तिचित्रणातून कादंबरीचे आशयसूत्र आविष्कृत करीत असतो. पण कथानक म्हणजे आशयसूत्र नव्हे. कादंबरीमध्ये वास्तवता येण्यासाठी कादंबरीचे आशयसूत्र महत्त्वाचे असते आणि हे आशयसूत्र लेखकांच्या जीवनविषयक दृष्टिकोणातून निर्माण झालेले असते.

कादंबरी हा निवेदन प्रधान वाङ्मयप्रकार आहे. त्यामुळे कादंबरीत सांगण्याजोगा भरपूर मजकूर असतो. या मजकुरांचा घटना, प्रसंग, पात्रे इत्यादीशी संबंध येतो. कथानकात या सर्वांचा समावेश होत असल्याने कथानक एकात्म होते. कादंबरीच्या प्रारंभापासून अखेरपर्यंत कथानकाची व्याप्ती असते. कादंबरीत घटना हा सर्वात लहान घटक असतो. कादंबरीचे कथानक प्रवाही ठेवावे लागते. एका घटनेतून दुसरी घटना अशी निर्मिती करावी लागते. कादंबरीत आशयाला अनुरूप अशी भाषा वापरावी लागते. तसेच लहान व सुट्या-सुट्या वाक्याद्वारा निवेदनाला गती प्राप्त करून द्यावी लागते. कथानकात प्रारंभ, मध्य आणि शेवट अशा तीन अवस्था असतात. कथानक हेच खरे कादंबरीचे मुख्यआधार ठरत असल्याने कथानकाचा शेवट ही स्वभाविकच असायला हवा. कादंबरी कथानक विरहित असू शकते. पण आशयसूत्र विरहित असू शकत नाही.

## ३.२ 'लोकसखा ज्ञानेश्वर' मधील आशयसूत्र :

ज्ञानदेवांचे वाङ्मयीन कार्य हे वेगवेगळ्या स्वरूपाचे असून त्यांनी आपले तत्त्वज्ञान सर्वसामान्य लोकापर्यंत पोहोचविण्यासाठी वाङ्मयनिर्मिती केली आहे. तसेच त्यांनी वारकरी संप्रदायाची तत्त्वे समाजातील सर्वसामान्य माणसापर्यंत रुजविण्याचे कार्य वाङ्मयाद्वारे केले आहे. ज्ञानदेवांनी भावार्थदीपिका, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी हे ग्रंथ लिहिले. त्याचबरोबर त्यांनी अभंग, ओवी, विराण्या, पदे, गौळणी इत्यादीची रचनाही केली.

ज्ञानदेवांदि भावंडांची मुंज करण्यास आळंदीच्या धर्मपंडितांनी नकार दिल्यावर ज्ञानदेव भावंडांना घेऊन पैठणला गेले. तेव्हा तेथील धर्मसभेत या मुलांच्या मुंजीविषयी बरीच चर्चा करण्यात आली. तसेच पैठणच्या धर्मसभेत ज्ञानदेवांनी रेड्यामुखी वेद वदविले. त्याचबरोबर त्यांनी आपल्या ज्ञानाचे दर्शन घडविल्यामुळे ते अतिशय प्रतिभावंत आणि जीवनाची मोठी समज असल्याचे त्या सभेतील धर्मपंडितांच्या लक्षात आले. त्यानंतर त्या सभेतील प्रमुखांनी ज्ञानदेवांदि भावंडांची मुंज करण्यास नकार देऊन त्यांना एक शुद्धिपत्र दिले. त्यानंतर ज्ञानदेवांनी पैठणमध्ये काही दिवस मुक्काम केला. तसेच त्यांनी तेथे 'श्राद्ध' व 'मूलधर्म तत्त्व' या विषयावर प्रवचन दिले. त्यांनी हे प्रवचन अतिशय प्रासादिक भाषेत, लोकजीवनातील आणि निसर्गातील दृष्टांत देऊन सांगितले. त्याचबरोबर त्यांनी 'श्राद्ध' विधीचे महत्त्व व तो घालण्यामागील हेतू श्रोत्यांना सविस्तर सांगितला.

पुढे काही दिवसांनी ज्ञानदेवांदि भावंडे पैठणहून नेवासे येथे मुक्कामास आली. तेव्हा ज्ञानदेव नेवासे गावाच्या पाटलांना धर्मशाळेत राहण्यामागील हेतू सांगतात, ''पाटीलकाका आपल्या वेदांतील सनातन धर्माचं ज्ञान सगळ्याच जनलोकांना कळावं, तिथं जाती पातीचा भेद मानू नये, कारण सगळीच आपण परमेश्वराची लेकरं आहोत. आमच्या मनात हाच हेतू ठेवून वेद-उपनिषदाचं सार, ज्यामध्ये प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णांनी सांगितलेलं आहे, ती भगवद्गीता जातपात न मानता, स्त्री-पुरुष भेद न करता सगळ्याच लोकांना कळावी म्हणून आम्ही ती लोकांना कळेल अशा सोप्या, सरळ भाषेत, त्यांच्या भाषेत समजून सांगण्यासाठी इंथ वर्षदीड वर्ष थांबावं म्हणतो. आजवर ब्राह्मणमंडळींनी केवळ संस्कृत भाषेच्या पिंजऱ्यात अडकवून ठेवलेला धर्माचा दिव्यपक्षी मुक्त करण्याचा आमचा संकल्प आहे. तेव्हा आम्हांला

आपल्या गावच्या धर्मशाळेत वर्ष दीड वर्ष रहायला आपण परवानगी द्यावी, अशी आपल्या पायी विनंती आहे.''[१] अशाप्रकारे त्यांनी समजावून सांगितल्यावर पाटलांनी त्या भावंडांना धर्मशाळेत राहण्यास परवानगी दिली.

त्यानंतर ज्ञानदेवांनी नेवासे येथील धर्मशाळेत दीड वर्षे मुक्काम केला. तसेच त्यांनी या कालावधीत गीतेवर बरेंच मनन, चिंतन करून काही टिपणेही तयार केली आणि श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेली गीता ते मराठी भाषेत तेथील पंचक्रोशीतील लोकांना सांगणार असल्याने तेथे व्यासपीठ तयार करण्यात आले. पहिल्या दिवशी ज्ञानदेवांनी गुरू निवृत्तिनाथाना व गणेशाला वंदन केले आणि त्यांनी गणेशाचे महत्त्व श्रोत्यांना सांगितले. तसेच त्यांनी गणेश म्हणजे आदितत्त्व, परमात्मा, परमेश्वर व सच्चिदानंद असल्याचेही सांगितले. त्याचबरोबर माणसाला उपासना, प्रार्थना व साधना यांच्यामुळे ब्रह्मरूप गणेश प्रसन्न झाल्यावर तो महामानव अथवा प्रतिपरमेश्वर होतो. त्यालाच आपण परमेश्वर असे म्हणतो. ज्ञानदेवांनी 'भावार्थदिपिका' या ग्रंथामागील निरूपणाचा हेतू श्रोत्यांना असा सांगितला आहे, ''आपण सर्वांनाही अशीच महामानव होण्याची प्रेरणा व्हावी म्हणून प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार असलेल्या श्रीकृष्णांनी किंकर्तव्यमूढ झालेल्या अर्जुनाला 'गीता' सांगितली. आजच्या समाजातही धर्माचं मूळ स्वरूप नाहीसं होऊन, त्याला कर्मकांड, थोतांड याचं क्षुद्रस्वरूप प्राप्त झालं आहे. ते नाहीसं व्हावं आणि गोंधळलेल्या आपल्यासारख्या सज्जन भक्तमानवांना आत्मविकासाचा मार्ग दिसावा, म्हणूनच भगवद्गीतेवर लोकभाषेत टीक-निरूपण करण्याचा मी प्रयत्न करणार आहे.''[२]

ज्ञानदेवांनी या ग्रंथाचे निरूपण श्रोत्यांना नाट्यात्मक पद्धतीने सांगितले. श्रीकृष्णाने अर्जुनाचा रथ दोन्ही सैन्याचा मध्यभागी नेऊन उभा केल्यावर त्याला दोन्हीकडे आपलेच नातेवाईक व सगेसोयरे दिसले. तेव्हा त्यांच्या मनाला खूप वाईट वाटले आणि या सर्वांना आपण मारण्यापेक्षा युद्ध न करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. तसेच त्याने आपला धनुष्यबाण रथातून खाली टाकून दिला. त्याचबरोबर या प्रसंगाविषयी अर्जुनाने श्रीकृष्णाला अनेक शंका व प्रश्न विचारले. त्यांच्या या प्रश्नांचे व शंकाचे उत्तर श्रीकृष्णाने भगवद्गीतेत सांगितले आहे. तसेच ही गीता त्यांनी अर्जुनाला निमित्त साधून आपणा सर्वांसाठी सांगितलेली आहे.

अशाप्रकारे ज्ञानदेवांनी या ग्रंथामागील हेतू श्रोत्यांना सांगून दररोज गीतेचे निरूपण ऐकण्यास येण्याची विनंती केली. तसेच ज्ञानदेव श्रोत्यांना ही गीता समजावी म्हणून रोजच्या जीवनातील, निसर्गातील, व्यवहारातील दृष्टांत, उपमा इत्यादी देत होते. ज्ञानदेवांनी श्रोत्यांना गीतेच्या दुसऱ्या अध्यायाचे जे सार सांगितले आहे. ते अभ्यासण्याजोगे आहे, ''थोडक्यात आप्तजन हो, मी असं सांगेन, की आपला देह क्षुद्र आहे. केवळ त्याचे चोचले पुरवण्यात माणसानं सर्व आयुष्य वाया घालवू नये. जो माणूस समाजाच्या कल्याणासाठी आपला देह झिजवतो, प्रसंगी त्याचा त्याग करतो. त्याच पुरुषाचं जीवन खऱ्या अर्थानं सार्थकी लागतं. एका अर्थानं समाज म्हणजेच त्यानं परमेश्वर मानलेला असतो. दुसरं असं, की समाजात आपापल्या वाट्याला आलेली जी कर्म करणं भाग असतं, ती क्षुद्र स्वार्थाच्या मोहापायी टाळू नयेत. ती करण्यातच आपण खरा धर्म आचरत असतो. तोच आपला स्वधर्म असतो. तिसरी गोष्ट अशी, की या सर्व सृष्टीचा निर्माता जो परमेश्वर आहे. त्यांच अस्तित्व अखंड आहे. तो अमर आहे आणि तो सर्वव्यापी आहे, अमर आहे हे जाणून त्याचाच अंश असलेल्या आपल्यातील आत्म्याचा कौल घेऊनच वर्तन केलं पाहिजे. म्हणजे 'तो परमेश्वर' मानला पाहिजे. थोडक्यात परमेश्वर मानणं, देहाची क्षुद्रता जाणणं आणि स्वधर्माचं आचरण अहंकारविरहित होऊन निर्मम बुद्धीनं करणं महत्त्वाचं आहे.''[३]

ज्ञानदेवांनी श्रोत्यांना गीतेच्या अध्यायातील संन्यास व त्याग म्हणजे काय हे सविस्तर सांगितले. तसेच श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता समजावून सांगितल्यावर त्यांचा मोह कमी झाला आणि अर्जुनाला खऱ्या स्वरूपाचे ज्ञान प्राप्त झाले. त्याचबरोबर त्यांच्या मनात कुठल्याही प्रकारची शंका राहिली नाही. तसेच श्रीकृष्ण जी आज्ञा सांगेल ती पाळण्यास अर्जुन तयार झाला होता. हे सर्व ज्ञानदेवांनी समोर बसलेल्या श्रोत्यांना अत्यंत प्रासादिक भाषेत समजावून सांगितले.

त्यानंतर ज्ञानदेवांनी श्रोत्यांना सांगितले की, आपल्या शाश्वत धर्माला अनेक अंगानी वाळवी लागली असून तो अनेक अंगाने कुरतडला आहे. तसेच अनेक पंथ, संप्रदाय, कर्मकांड, धार्मिक मतभेद, वर्ण, जाती, अहंकार इत्यादीमुळे समाजाला वाळवी लागली

आहे. तेव्हा समाजातील या सर्वांना ही गीताच खरा धर्म सांगत असल्याने ती साध्य, सरळ लोकभाषेत लिहिण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी श्रोत्यांना सांगितले.

'भावार्थदीपिका' या ग्रंथाच्या एकूण नऊ हजार ओव्या असून त्यात अज्ञानवादाचे खंडन व चिद्विलासाचे स्वतंत्र तत्त्वज्ञान ज्ञानदेवांनी सांगितले आहे. भगवद्गीताही संस्कृत भाषेत असल्याने ती सर्वसामान्य लोकांना समजत नव्हती. तसेच जनसामान्यांना संस्कृत भाषा येत नव्हती. त्यामुळे ही सर्व माणसे या ग्रंथातील ज्ञानापासून वंचित राहू नयेत म्हणून त्यांनी हा ग्रंथ मराठी भाषेत लिहिला आणि त्यांनी आपल्या स्वतंत्र प्रतिभेच्या बळावर गीतेला नवे रूप दिले. या ग्रंथाचे लेखन पूर्ण झाल्यावर समाप्ती सोहळा साजरा करण्यात आला आणि त्यांनी श्रोत्यांना हा ग्रंथ गुरु निवृत्तिनाथाच्या आज्ञेने पूर्ण केल्याचे सांगून त्यांनी श्रोत्यांचे आभारही मानले. ज्ञानदेवांनी हा ग्रंथ लिहिला म्हणून श्रोते त्यांना 'ज्ञानेश्वर माऊली' असे म्हणत.

ज्ञानदेवांनी जनसामान्यासाठी ग्रंथनिर्मिती आणि धर्मविचारांचा प्रसार करण्याचे व्रत स्वीकारल्यामुळे त्यांनी आळंदीच्या पंचक्रोशीतील लोकांनासुद्धा या ग्रंथाचे निरूपण सांगितले. तसेच त्यांनी या ग्रंथ लेखनामागील हेतूही त्यांना सांगितला. त्याचबरोबर त्यांनी या ग्रंथाचे महत्त्वही श्रोत्यांना सांगितले. त्यांनी भक्तिमार्ग, ज्ञानमार्ग व कर्मयोग यांचे गीतेतील तत्त्वज्ञान मराठी भाषेत सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचावे या हेतूनेच त्यांनी गीतेवरील मराठी भाष्य लिहिले. शेवटी ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरीत' जे पसायदान मागितले. ते त्यांनी स्वत:साठी मागितले नाही तर ते समाजाच्या हितासाठी व कल्याणासाठी मागितले आहे.

अशाप्रकारे ज्ञानदेवांनी बारा-चौदा महिने गीतेच्या अठरा-अध्यायाचे निरूपण श्रोत्यांना सविस्तर सांगितले. तसेच शेवटच्या अध्यायाचे निरूपण सांगून झाल्यावर त्यांनी श्रोत्यांना नमस्कार केला आणि ते थोडे भावनाशील झाले.

ज्ञानदेवांनी लिहिलेला 'भावार्थदीपिका' हा ग्रंथ टीकापर होता. तसेच हा ग्रंथ लिहिल्याबद्दल विसोबा चाटीने त्यांना शिव्या देऊन अपमानित केले होते. तर गुरूनिवृत्तिनाथानी स्वतंत्र ग्रंथनिर्मिती करण्याची इच्छा त्यांच्या जवळ व्यक्त केली होती. म्हणून ज्ञानदेवांनी पाच-सात महिने वाचन, मनन, चिंतन केले. त्यानंतर काही महिन्यांनी

त्यांनी 'अनुभवामृत' हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. हा ग्रंथ लहान असला तरी त्यातील आशय महान होता. तसेच या ग्रंथाच्या एकूण आठशेभर ओव्या आहेत. ज्ञानदेवांनी या ग्रंथाचे निरूपण सिद्धेश्वराच्या मंदिरात सात दिवस सांगितले. या ग्रंथाच्या निरूपणासाठी अनेक ब्राह्मण मंडळीना त्यांनी निमंत्रित केले होते.

ज्ञानदेवांनी या ग्रंथाचा लेखन हेतू आळंदीच्या सिद्धेश्वर मंदिरात श्रोत्यांना सविस्तर सांगितला. तसेच त्यांनी सुरुवातीला लोकदेवतेला श्रद्धापूर्वक नमस्कार करून त्यांनी मानवी 'मन' व देहाचे असलेले अतूट नातेसंबंध स्पष्ट केले. मानवी मन हे लहानपणापासून मानवी देहाचे सेवक म्हणून कार्य करीत असते. मनामुळेच मानवी देह फुलतो. तसेच देहामुळे मनापर्यंत आनंद व सुख पोचते आणि त्यामुळे मन फुलून येते. मन अनुकूल-प्रतिकूल प्रसंगी देहाला उपदेशही देते आणि ते देहाचे पालन, पोषण व संरक्षण करते. मनामध्ये अनेक प्रकारचे संकल्प, विकल्प व अनुभव साठविले जातात. काही माणसे आपल्या मनाला विशिष्ट वळण लावून त्यांच्यावर वेळीच योग्य ते संस्कार निर्माण करतात. मनाला मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ अंतिम ध्येय दाखवून त्याला त्या दिशेने चालना, प्रेरणा देणे अत्यंत महत्त्वाचे असते. तसेच या अंतिम ध्येयाची जीवनात लवकर पूर्तता करणे आवश्यक असते. अशाप्रकारे ज्ञानदेवांनी या ग्रंथातील मनाची व देहाची माहिती श्रोत्यांना सांगितल्यानंतर त्यांनी अनुभवाची माहिती त्यांना सांगितली ती अशी आहे, ''माणसाला मरणाची भीती का वाटते? ती भीती वाटणे कसे चुकीचे आहे ? मूळ मानवी जीवनाची अखंडता समजून घेतली तर जीवन कसे आनंदमय होते. आनंदमय जीवनाची गुरुकिल्ली समजून घेण्यासाठी 'शांकरी विद्या' कशी उपयुक्त ठरते, अखंड आनंदमय जीवनातून मानवी जीव कसा अलग पडतो, विभागून कसा बाहेर पडतो, अखंडतेचा महाप्रवाह म्हणजे शिव तो खंडून बाहेर अलग पडलेला भाग म्हणजे शक्ती. ह्या शिवशक्तीचा सतत खेळ कसा चालतो, त्यातून मानवी दु:खे कशी निर्माण होतात, म्हणून मूळ चैतन्यमय जीवनात बुद्धीने, हृदयाने, कर्माने माणसाने एकात्म होण्याची कशी गरज आहे. हे एकात्म होणे म्हणजे शिवमय, चैतन्यमय, आनंदमय होणे कसे आहे, या अनुभवाचा विस्तार आणि विवेचन मी 'अनुभवामृतात' केले आहे.''[४]

ज्ञानदेवांनी सात दिवस या ग्रंथाचे निरूपण सांगितल्यावर शेवटच्या दिवशी या ग्रंथाचा समाप्तीसोहळा साजरा केला. तसेच त्यांनी या ग्रंथाचे निरूपण तीन महिने आळंदीच्या पंचक्रोशीतील गावोगावी जाऊन दिले. त्याचप्रमाणे त्यांनी पंढरपुरच्या वारकरी सभेत या ग्रंथाचा आशय सांगून त्याचा वारकरी संप्रदायाशी असलेला घनिष्ठ संबंधही प्रवचनात सांगितला. ज्ञानदेवांनी हा ग्रंथ पारमार्थिकासाठी लिहिला असून त्यामध्ये शिव आणि शक्ती ही दोन्ही वेगळी नसून ती एकच असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी शिव-शक्ती हीच जगाची मूळ असल्याचेही सांगितले. ही त्यांची या ग्रंथामागील भूमिका असून त्यांचे स्वतंत्र असे तत्त्वज्ञान शुद्ध स्वरूपात याच ग्रंथात प्रगट झालेले आहे.

ज्ञानदेवांनी या ग्रंथाद्वारे समाज कल्याणाची जाणीव सतत करून देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच त्यांनी या ग्रंथातून आपला उपदेश सर्व लोकांच्या कल्याणासाठी असल्याचे सांगितले. ज्ञानदेवांनी आदिशक्तीला वंदन करून या ग्रंथात चिद्‌विलासाचा सिद्धांत सांगितला आहे. या ग्रंथाचे स्वरूप तत्त्वज्ञानमय असल्यामुळे तो सर्वसामान्य लोकांपेक्षा विद्वान व बुद्धिमान पंडितामध्ये अधिक प्रिय झाला आहे. ज्ञानदेवांनी या ग्रंथांचे रहस्य सांगण्याचे व्रत निष्ठेने पूर्ण केले. तसेच त्यांनी श्रोत्यांना मानवी जीवन आणि त्याचे परमेश्वराशी असलेले नाते संबंध समजावून सांगितले.

हटयोगी चांगदेवांच्या पत्रास ज्ञानदेवांनी पासष्ट ओव्या लिहून दिलेले उत्तर म्हणजे 'चांगदेव पासष्टी' हा ग्रंथ होय. ज्ञानदेवांनी या ग्रंथातून चांगदेवास उपदेश केला आहे. अनुभवामृतामधील तत्त्वज्ञान 'चांगदेव पासष्टी' या ग्रंथात साररूपाने आले आहे. तसेच त्यांनी या ग्रंथाद्वारे चिद्‌विलासवादाच्या हेतूनेच पूर्णाद्वैताचा बोध केला आहे. हे पत्र अध्यात्मबोधपर असून त्यांनी योगविद्येपेक्षा आत्मविद्येचे श्रेष्ठत्व या ग्रंथात मांडले आहे. या ग्रंथाची भाषा मधुर व रसाळ आहे.

ज्ञानदेवांनी अनेक अभंग, विराण्या, गौळणी व हरिपाठाचे अभंग लिहिले आहेत. ज्ञानदेवांचा अभंग लेखनामागचा हेतू हा जीवनदृष्टी आणि तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविणे हा आहे. तसेच त्यांनी या अभंगाद्वारे भक्तीची तत्त्वे सर्वसामान्यांना समजावून सांगितली. त्याचबरोबर पंढरपूरचे महात्म्य त्यांनी अनेक अभंगातून चित्रित केले आहे. तर

हरिपाठांच्या अभंगातून त्यांनी साध्या व सोप्या भाषेतून परमार्थ सांगितला आहे. अशाप्रकारे ज्ञानदेवांची वाङ्मयीन कामगिरी म्हान असल्याचे दिसते. त्यांनी आपल्या वाङ्मयातून सांगितलेले तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनतेला फार मोलाचे ठरलेले आहे.

'लोकसखा ज्ञानेश्वर'या कादंबरी लेखनामागे आनंद यादव यांचे अनेक हेतू असल्याचे दिसून येते. तसेच यादवांना ज्ञानदेवांच्या जीवनचरित्रांविषयी आवड व गोडी असल्याने त्यांनी ही कादंबरी लिहिण्यापूर्वी चाळीस-पंचेचाळीस वर्षे ज्ञानदेवांचे जीवनचरित्र अनेक ग्रंथातून समजावून घेतले. त्याचबरोबर त्यांनी या कादंबरीच्या लेखनासाठी ज्ञानदेवांच्या जीवनचरित्रावर व त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वावर अनेक विद्वानांनी लिहिलेले निवडक असे तीस-पस्तीस ग्रंथ वाचले होते. संत ज्ञानदेवांचे जीवनचरित्र वाचकांना समजावे. तसेच ज्ञानदेवांनी लिहिलेल्या भावार्थदीपिका, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, अभंगवाणी इत्यादीमधील तत्त्वज्ञान समाजातील सर्वसामान्य जनतेला कळावे. त्याचबरोबर ज्ञानदेवांचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक इत्यादी क्षेत्रातील कार्य समाजातील लोकांना समजावे. तत्कालीन समाजातील न्यायदानाची पद्धत, सनातन कर्मठ ब्राह्मण समाजाची प्रवृत्ती, समाजातील रूढी, परंपरा, श्रद्धाअंधश्रद्धा, चालीरिती, कर्मकांड, व्रत-वैकल्य इत्यादी सर्वसामान्य जनतेला समजावे.

ज्ञानदेवांनी अठरापगड जातीजमातीचे लोक एकत्र करून त्यांना आध्यात्मिकतेची शिकवण दिली आणि त्यांनी वारकी संप्रदायाचा पाया घातला. तसेच त्यांनी शेवटी संजीवनी समाधी घेतली. थोडक्यात ज्ञानदेवांचे जीवनचरित्र, त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्व, त्यांनी ग्रंथाद्वारे समाजाला सांगितलेले तत्त्वज्ञान, तत्कालीन काळातील समाजजीवन इत्यादी आधुनिक समाजातील लोकांना समजावे. हाच हेतू प्रस्तुत कादंबरीच्या लेखनामागे लेखकाचा असल्याचे दिसते.

### ३.३ समारोप :

'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीमध्ये लेखकाला केवळ ज्ञानदेवांचे जीवनचरित्रच सादर करावयाचे नव्हते. तर ज्ञानदेवांनी भावार्थदीपिका, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी व अभंगवाणी यामधून जे तत्त्वज्ञान सांगितले आहे ते त्यांना या कादंबरीतून सादर करायचे होते.

तसेच ज्ञानदेवांनी या ग्रंथांचे निरूपण आळंदीच्या पंचक्रोशीतील गावोगावी जाऊन श्रोत्यांना सांगितले आणि त्यांनी या ग्रंथांचा वारकरी संप्रदायाशी असलेला संबंधही सविस्तर श्रोत्यांना सांगितला. ज्ञानदेवांनी अठरापगड जातीजमातीच्या लोकांना एकत्र करून भागवत संप्रदायाचा पाया घातला आणि त्यांनी सर्वसामान्य जनतेला साधा-सोपा भक्तिमार्ग दाखविला. ज्ञानदेवांच्या जीवनाची, साहित्याची व कार्याची माहिती वाचकांना व्हावी या हेतूनेच लेखकाने ही कादंबरी लिहिल्याचे दिसते. यानंतर पुढील प्रकरणामध्ये 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीमधील समाजदर्शनाचा अभ्यास करावयाचा आहे.

## संदर्भ

१. यादव, आनंद, 'लोकसखा ज्ञानेश्वर,' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दुसरी आवृत्ती, सप्टेंबर,२००६ पृ. क्र. २८८

२. तत्रैव : पृ. क्र. ३०२

३. तत्रैव : पृ. क्र. ३०८-०९

४. तत्रैव : पृ. क्र. ३८०